अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र. ०८** चा सरतपास

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – प्रदिप शशिकांत गोसावी,

वय – ५१ वर्षे, हुद्दा – पो.हवा. ब.क्र. २५

नेमणूक – जिल्हा वाहतूक शाखा, सिंधुदुर्ग.

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. जी. आर. माजगांवकर

१. मी सन २०२३ ते २०२५ या कालावधीत सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो.

२. सदर कालावधीत माझ्याकडे सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे गु.र.क्र. १३/२०२४ चा भा. द.वि. कलम २७९, ३३७, ३३८ वगैरे चा तपास देण्यात आला. मोटरसायकल क्र. एम.एच. ०७ वाय १६०० व ट्रक क्र. एम.एच. ०९ सी.सी. ३३३५ मध्ये अपघात झालेबाबत चिदानंद मेहत्रे यांनी दिले खबरी वरुन सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे मोटर अपघात रजिस्टर क्र. ०२/२०२४ प्रमाणे मोटर अपघात दिनांक २१/०१/२०२४ रोजी दाखल होता.

३. सदर अपघाताच्या अनुषंगाने दिनांक २१/०१/२०२४ रोजी ट्रक चालक चिदानंद मेहत्रे व मोटरसायकलस्वार गणेश झगडे यांना मोटर वाहन अधिनियम, कलम २०९ अन्वये नोटीस देण्यात आली. आता मला सदरच्या नोटीसा दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सबब, त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. पी.५/पी.डब्ल्यू.८ व पी.६/पी.डब्ल्यू.८** देण्यात येत आहे.

४. एस.एस.पी.एम. हॉस्पीटलमधून एमएलसी प्राप्त झाली होती. त्यावरुन एस.एस.पी.एम. हॉस्पीटल मध्ये जखमींचा जबाब नोंदवण्यास गेलो असता जखमी विदिशा झगडे व गणेश झगडे यांना अधिक उपचाराकरीता गोवा मेडीकल कॉलेज येथे रवाना करण्यात आले. त्यामुळे त्यांचा जबाब नोंदविण्यात आला नाही. एस.एस.पी.एम.

हॉस्पीटल यांनी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र तपासकामी सामील केले.

५. दिनांक २२/०१/२०२४ रोजी फिर्यादी चिदानंद मेहत्रे यांनी दाखवलेल्या घटनास्थळी पंच पराग परुळेकर व योगेश वेंगुर्लेकर यांचे समक्ष घटनास्थळ पंचनामा केला. तसेच दोनही वाहनांचे तपासणी होणेबाबत आर.टी.ओ. सिंधुदुर्ग यांना दिनांक २३/०१/२०२४ रोजी पत्र दिले. ते तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सबब, त्यास निशाणी क्र. **पी.७/पी.डब्ल्यू.८** देण्यात येत आहे.

६. वैद्यकीय अधिकारी यांना वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र देण्यात आले. आता मला पत्राची स्थळप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सबब, त्यास निशाणी क्र. **पी.८/पी.डब्ल्यू.८** देण्यात येत आहे.

७. दिनांक १०/०२/२०२४ रोजी जखमी विदिशा झगडे यांचे पती गणेश झगडे यांनी दिले खबरीवरुन वरील प्रमाणे गुन्हा रजिस्टरी दाखल करण्यात आला. वरीष्ठांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास केला. सदर गुन्ह्यातील जखमी यांचे एस.एस.पी.एम. हॉस्पीटल पडवे व गोवा मेडीकल कॉलेज यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन गुन्ह्याचे कामी सामील केली. तसेच आर.टी.ओ. सिंधुदुर्ग यांचेकडील अपघातातील वाहनांची तपासणी केलेबाबात प्रमाणपत्र व मोटर अपघातातील कागदपत्रे गुन्ह्याचे कामी सामील केली. तसेच साक्षीदार विदिशा झगडे, सहा. पोलीस फौजदार नंदकुमार गोसावी, म.पो.हे.कॉ. १३४ नागरगोजे, म.पो.कॉ. १२५५ पावसकर व इतर साक्षीदार यांचेकडे चौकशी करुन त्यांची टिपणे नोंदवून तपासकामी सामील केली. एकंदरीत तपासात ट्रक चालक चिदानंद मेहत्रे याने त्याचे ताब्यातील ट्रक क्र. एम.एच.०९ सी.सी. ३३३५ हा भरधाव वेगात चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन समोरील वाहनात सुरक्षित अंतर न ठेवता पाठीमागील बाजूने मोटरसायकल क्र. एम.एच. ०७ वाय १६०० ला जोरदार धडक देऊन मोटरसायकलस्वार गणेश झगडे व त्यांची पत्नी यांना धडक देऊन मोटर अपघात करुन त्यांच्या मोटरसायकलच्या नुकसानीस

तसेच दोघांच्या दुखापतीस कारणीभूत झाला म्हणून तुमचे विरुध्द योग्य तो पूरावा झाल्याने दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. ए. ए. शेख यांचेमार्फत.</u>

८. मला तपासकामाचा २० वर्षांचा अनुभव आहे. मोटर वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे आरोपीस पाठवलेली नोटीस कधी स्विकारली ते नमूद नाही. नोटीसीवरील नमूद दिनांक हा पेनाने लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोटीस पोस्टाने पाठवलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोटीस आरोपीस गुन्हा दाखल करण्यापूर्वी दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, विलंबाची कारणे फिर्यादीमध्ये कॉलम क्र. ८ मध्ये नमूद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, राजकीय दबावाखाली खोटी व खोडसाळ फिर्याद दिलेली आहे.

९. घटनास्थळ ओट्रा रेसीडन्सी हा वर्दळीचा परीसर आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंच पराग परुळेकर यांना पंचनाम्यासाठी हजर राहणेबाबत दिलेले लेखी पत्र याकामी दाखल केलेले नाही. अपघाताची अंतिम वस्तुस्थिती दर्शविणारे फोटोग्राफ्स याकामी सामील केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, समोरुन येणाऱ्या मोटरसायकलस्वाराचे टिपण याकामी नोंदवलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात स्थळावरील टायर मार्कसचे फोटो याकामी सामील केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी त्रयस्थ साक्षीदारांचे टिपण नोंदवलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर कामी घटनेच्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचे टिपण नोंदवलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, याकामी स्टेशन डायरीचा उतारा सामील केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, याकामी सरकारी गाडीचा लॉगबूक उतारा याकामी सामील केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाहनाचे आर.टी.ओ. इन्सपेक्शन करतेवेळीचे फोटो याकामी दाखल केलेले नाहीत.

१०. फिर्यादी हे त्यांच्या पत्नीसह कुडाळकडून कणकवलीच्या दिशेने जात होते असे माझ्या तपासात निष्पन्न झाले होते. मोटर अपघात खबर देते वेळेस तक्रारदाराने फिर्यादी व त्यांची पत्नी मोटरसायकलवरुन सिलेंडर घेऊन जात असल्याचे सांगितले

होते. हे म्हणणे खरे नाही की, समोरुन येणारा मोटरसायकलस्वार चुकीच्या दिशेने आल्याने फिर्यादी व त्यांची पत्नी रस्त्यावर पडून जखमी झाले. हे म्हणणे खरे नाही की, समोरुन येणारा मोटरसायकलस्वार मिळून न आल्याने केवळ बळीचा बकरा म्हणून मागून येणाऱ्या ट्रक चालकाविरुध्द फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कधीही निष्काळजीपणे, बेदरकारपणे वाहन चालवून फिर्यादी चालवित असलेल्या मोटरसायकलला धडक दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या चुकीमुळे कोणत्याही दुखापती झाल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताचा वस्तूस्थितीदर्शक पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आपल्याच खात्यातील व आपल्याशी संबंधित साक्षीदारांची तपासटिपणे नोंदवली आहे. हे म्हणणे खरे नाही की, चुकीचे तपासकाम करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रकरणातील सी.सी.टी.व्ही फूटेज खोटे व बनावट हजर केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सी.सी.टी.व्ही. फूटेज कोणाच्या मालकीचे व कोणाच्या ताब्यात होते हे दर्शविणारा कागदोपत्री पूरावा तपासकामी सामील केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फूटेजची कोणतीही हॅश व्हॅल्यू काढलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,<br>
सही/–<br>
(श्रीमती स्वाती जं. पाटील)<br>
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,<br>
सिंधुदुर्ग – ओरोस.

दिनांकः ०९/०७/२०२६.